महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४
दूरध्वनी क्र.:-०२०- 29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com

# आदेश

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ.४/२०२४/ 4808
दिनांक :- 07/11/2024

**विषय:- माहिती अधिकार अधिनियम - २००५ लागु असणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार प्रकरण एक मधील कलम क्र. २ (ज) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ विशद करण्यात आली आहे. त्यामधील (घ) नुसार समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनाद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था,असा आहे .

ज्याअर्थी सर्व शासनमान्य टंकलेखन व संगणक संस्था ह्या शासनाकडून मान्यताप्राप्त आहेत, त्यावर शासनाच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे या संस्थेचे नियंत्रण आहे. तसेच शासन मान्यता घेऊन संस्था विद्यार्थी प्रवेशित करु शकतात व त्यांच्याकडून देय शुल्क आकारतात. यामुळे सर्व शासनमान्य टंकलेखन व संगणक संस्था ह्या माहिती अधिकार अधिनियम कक्षेत येतात हे स्पष्ट आहे.

या कार्यालयाकडे वारंवार शासनमान्य टंकलेखन व संगणक संस्थांमधील माहिती मिळणेबाबतचे माहिती अधिकार अर्ज प्राप्त होत असतात. या संस्थांची संख्या सुमारे ३००० इतकी आहे. उपरोक्त संस्था ह्या शासनमान्य असल्याने स्वतंत्र कार्यालय गणले जातात.

तेव्हा या संस्थांविषयी परीक्षा परिषदेत जे अर्ज माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त होणे योग्य होणार नाही. तेव्हा या पत्राद्वारे आदेशित करण्यात येते कि, उपरोक्त नियमानुसार सर्व शासनमान्य संस्थांमधील प्राचार्य हे जन माहिती अधिकारी असतील व त्या त्या जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे प्रथम अपिलीय अधिकारी असतील,याची सर्व संस्थाचालक व सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे-०४

प्रत माहितीस्तव :

१) विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,सर्व.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव :

१) मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१.
२) शिक्षणाधिकार (माध्यमिक),जि.प.सर्व.
३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प)
४) शासनमान्य वाणिज्य व संगणक टायपिंग संस्था (सर्व) महाराष्ट्र व गोवा राज्य .

**यांना देऊन कळविण्यात येते कि, माहिती अधिकार कायदयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी. तसेच सदर आदेश सर्वांच्या निदर्शनास आणुन दयावे.**

C:\Users\Computer\Desktop\shital lonkar 16012024\S\letter\Sanstha letter.doc